# भारतीय ज्ञान परंपरेतील इतिहास, समाज, राज्य, अर्थव्यवस्था आणि संस्कृती

**डॉ. मोनाली यशवंत बहादुरे**
नूतन आदर्श कला, वाणिज्य आणि
श्रीमती म.ह.वेगड
विज्ञान महा., उमरेड.
M. No. 9765047945

**गोषवारा**

हजारो प्रवाहांना पोटाशी घेत एक नदी दुसरीकडून येणाऱ्या नदीच्या गळ्यात पडते आणि दोन्ही नद्या एकत्र होऊन सागराला मिळतात आणि सागरही ''सागरे सर्व तीर्थानि या म्हणीनुसार सर्वांना आपल्यात समावून घेतो. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृती विविधतेतून एकता प्रकट करुन आपले सर्वसमावेशक अस्तित्व आजतागायत टिकून आहे. भारतीय संस्कृती आधुनिक जगामध्ये एकमेव जिवंत सभ्यता आहे ज्याचा भूतकाळाशी थेट आणि जिवंत संबंध आहे. प्राचीन भारतीय संस्कृती आणि परंपरा आजही सामान्य लोकांच्या जीवनात टिकून आहे. भारतीय ज्ञानपरंपरा ही अद्वितीय ज्ञान आणि बुद्धीचे प्रतीक आहे, ज्यामध्ये ज्ञान व विज्ञान, वैश्विक आणि दिव्य, कर्म आणि धर्म तसेच भोग आणि त्याग यांचा अद्‌भूत समन्वय आहे. प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीने जीवनातील नैतिक, भौतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक मूल्यांवर लक्ष केंद्रित केले आहे. भारतीय ज्ञानपरंपरेचा इतिहास हा अत्यंत प्राचीन, विस्तृत आणि बहुविध आहे. ज्ञानाचा विकास केवळ बौद्धिक स्तरावर नसून अध्यात्म, समाज, विज्ञान कला, राजकारण, धर्म आणि व्यावहारिक जीवनाशी एकत्रितपणे घडलेला दिसते. समग्रता, सातत्य, विविधता आणि मानवकेंद्री दृष्टिकोन हे मुख्यतः ज्ञानपरंपरेचे वैशिष्ट्ये आहे. भारतीय ज्ञानपरंपरेचा इतिहास हा फक्त ग्रंथपरंपरेपुरता मर्यादित नसून तो जीवनपद्धती, संस्कृती, नैतिक मूल्ये आणि व्यावहारिक अनुभव यांच्याशी जोडलेला आहे. भारतीय ज्ञानपरंपरा आणि समाज यांचा संबंध अखंड, सेंद्रिय आणि परस्परपुरक आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ ऐतिहासिक गोष्ट नाही तर ती भारतीय समाजाच्या मुलभूत गाभ्यामध्ये रूजलेले ज्ञान आहे. भारतीय ज्ञानपरंपरा समाजाच्या घडणीची मुलभूत शक्ती आहे. तिने भारतीय समाजाला सांस्कृतिक, अध्यात्मिक आणि बौद्धिक दृष्ट्या समृद्ध केले. आजच्या वैज्ञानिक युगात या परंपरेतील समग्रता, मूल्यव्यवस्था आणि शाश्वततेच्या संकल्पना समाजाला योग्य दिशा देण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरतात. भारतीय ज्ञान परंपरेनी राज्यव्यवस्थेबाबत मार्गदर्शन करतांना असे सांगते की, एक आदर्श राज्यव्यवस्था कशी असावी याचे संपूर्ण तत्त्वज्ञान दिले. या ज्ञान परंपरेनुसार राज्यव्यवस्था ही केवळ सत्ता नसून, ती धर्म आणि नीती यांवर आधारित कर्तव्य आहे. भारतीय ज्ञान परंपरेने राज्यव्यवस्थेला धर्म, नीती आणि लोककल्याण या त्रिकुटावर उभे केले आहे. ही परंपरा आजही नीतिमान, पारदर्शक आणि लोककल्याणकारी शासन कशाप्रकारे चालवता येते याचे मार्गदर्शन करतांना आढळते.

भारतीय ज्ञानपरंपरेत कौटिल्याच्या विचारांनी भारतीय अर्थशास्त्राला एक नवा दृष्टिकोन दिला आणि आजच्या काळातही त्यांच्या सिद्धांताचे महत्त्व अबाधित असलेले आपल्या नजरेस दिसून येते. कौटिल्याचे अर्थशास्त्र हे भारतीय ज्ञानपरंपरेचे एक अमूल्य रत्न आहे ज्याच्या आधारे समाजाच्या प्रगतीसाठी उपयुक्त मार्गदर्शन मिळते. अर्थशास्त्र हा ग्रंथ व्यापार आणि वाणिज्याच्या व्यवस्थापनासाठी एक व्यापक मार्गदर्शक ठरतो त्यात विविध आर्थिक संकल्पनांची सखोल मांडणी केली आहे जी आजच्या आधुनिक व वैज्ञानिक युगात महत्त्वाची मानली जाते. समाजाच्या दृष्टीने ज्ञान परंपरेला खूप महत्त्व असते. प्राचीन व गौरवशाली परंपरेमुळे समाज सचेतन व संघटित होतो आणि त्यामुळे समाजाला स्थैर्यत्व प्राप्त होते. ज्ञान परंपरेमुळे कोणत्याही संकटाचा सामना करुन समाज आपले सातत्य टिकविण्याचा प्रयत्न करतो. निःसंशयपणे भारतीय ज्ञान परंपरा यांचा इतिहास, समाज, राज्यव्यवस्था, अर्थव्यवस्था आणि संस्कृती यांचा निकटचा संबंध आहे.

**बीजशब्द:** ज्ञान परंपरा, भारतीय समाज, प्राचीन, संस्कृती, राज्य, अर्थ, इतिहास

**प्रस्तावना:-**

विविधतेने नटलेल्या आपल्या भारताची ज्ञानपरंपरा अतिशय समृद्धी अशी होती. या ज्ञानपरंपरेने संपूर्ण जगावर आपली छाप सोडली आहे. ज्ञान, विज्ञान, साहित्य कला धर्म, तत्वज्ञान, राज्य, समाज, अर्थ अशा सर्व स्तरांवर एक समृद्ध वारसा आपल्याला लाभला असे आपणांस दिसून येते. नालंदा, तक्षशिला, विक्रमशीला यासारखी विश्वविद्यालये भारतात होती. विश्वातून अनेक लोक ज्ञानग्रहणासाठी आपल्या देशात येत असल्याचे दिसून येते.

अनेक रूढी परंपरा, चालीरीती चालत आलेल्या असतात. या रूढी परंपरा, चालीरीती कुठेही लिहून ठेवलेल्या नसतात. हे पारंपारिक ज्ञान काही भाग सुत्र रूपाने, तर काही सिद्धांत रूपाने ग्रांथित केला गेला आहे.

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Humanities And Indian Knowledge System Feb'26
Issue–I(I), Volume–XIV

या ग्रंथामधुन विविध शास्त्र, विज्ञान किंवा तत्वज्ञान सांगितलेले आहे. या ग्रंथबद्ध ज्ञानाला भारतीय ज्ञान संस्था असे म्हटले जाते. भारतीय ज्ञानपरंपरा म्हटले की, प्राचीन काळातील ज्ञानदान करणाऱ्या सर्व, व्यक्ती, संस्था, समूह आणि ज्ञानार्जन करणारे सर्व, व्यक्ती, संस्था, समूह आणि ज्ञानार्जन करणारे सर्व घटक आपल्या दृष्टिस पडतात.

प्राचीन विद्वत्ता आणि बौद्धिक विकासाचा वारसा असलेल्या भारतामध्ये प्राचीन ज्ञानप्रणालीचा एक समृद्ध खजिना आहे. या ज्ञानप्रणालीने आपल्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परिदृश्याला एक महत्वपूर्ण आकार दिलेला आहे. अशा या भारत देशाच्या भूतकाळाविषयी या देशाच्या ज्ञानपरंपरांचे आपल्याला किती ज्ञान आहे. या ज्ञान परंपरांचे आपल्याला विसर तर पडला नाही? याचे चिंतन करणे गरजेचे आहे. जगातील सर्वच देशांमध्ये त्यांच्या त्यांच्या ज्ञानपरंपरा आहेत. या परंपरांवर हजारो वर्षे पुरातन असलेल्या धर्मसंत्तेचा प्रभाव असणे साहाजिकच आहे. जसे की, अमेरिकन आणि युरोपियन ज्ञानपरंपरेत ख्रिश्चन धर्माचा, अरेबिक जानपरंपरेवर इस्लाम आणि त्याचप्रमाणे भारतीय ज्ञानपरंपरेत हिंदू-बौद्ध-जैन-शीख या भारतात जन्म पावलेल्या विचारधारांचा आणि धर्म संस्थांचा प्रभाव असेल्याची जाणीव होतांना दिसते. हजारो वर्षांच्या विचारधारांच्या, तत्वज्ञानाच्या व विज्ञानाचा एकत्रित प्रवासाचे मुर्त रूप म्हणजे भारतीय ज्ञान परंपरा. भारतीय ज्ञानपरंपरेची सुरूवात सिंधू संस्कृतीपासून मानली आहे. त्यानंतर वेद, उपनिषदकडे महाभारत, रामायण आणि अनेक पुराण ग्रंथांबरोबर बौद्ध, जैन, चार्वाक यांची विचारधारा, महानुभाव, नाथ, वारकरी, दत्त, समर्थ अशा संतपरंपरेने मांडलेली जीवनमुल्ये आजही आपल्या जीवनात महत्वाची भूमिका बजावत असल्याचे दिसून येते. यातून उदयास आलेले तत्वज्ञान हे केवळ अध्यात्मिक नाही तर जीवनाच्या प्रत्येक पैलूला व्यापून उरणारे आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ प्राचीन संस्कृतीचा वारसा नसून, आजच्या युगातही आपली उपयुकता सिद्ध करणारा एक महत्वाचा अमूल्य असा ठेवा आहे.

**भारतीय ज्ञान परंपरेची व्याख्या**

भारतीय संस्कृतीने ज्ञानाला अत्यंत महत्व दिले आहे. भारतीय संस्कृतीत जगभरातील हस्तलिखितांचा सर्वात मोठा संग्रह, बौद्धीक ग्रंथाचा विस्तृत संग्रह, तत्वज्ञान व शैक्षणिक संस्था यांच्याशी संबंधित ज्ञानाचे विस्तृत स्वरूप आढळून येते. भारतातील सर्व तर्कसंगत व तात्त्विक विचारमंथनाचा केंद्रबिंदू म्हणजे ज्ञान होय.

''प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेमध्ये दर्शन, ज्ञान व विद्या ह्या ती महत्वाच्या संकल्पना एकमेकांना पूरक ठरतात. 'दर्शन' एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील 'ज्ञान' एकत्रित करून त्याचे नियोजन करून तत्वज्ञानासाठी मार्गदर्शक दृष्टीकोन प्रदान करते ज्याला 'विद्या' म्हटले जाते, ज्याचा उद्देश म्हणजे आत्मचिंतन व शिक्षण होय.''

''ज्ञान परंपरा म्हणजे विशिष्टे तत्वज्ञान, नीतिमूल्ये, आणि पद्धतींवर आधारित ज्ञानाचे सातत्यपूर्ण, पद्धतशीर आणि पिढ्यानपिढ्या चालत आलेले हस्तांतरण होय.''

**संयुक्त राष्ट्रांच्या मते,**

परंपारिक ज्ञान किंवा स्थानिक ज्ञान हे बहुतेकदा प्रतिकुल वातावरणात जीवन आणि जगण्याच्या गुंतागुंती समजून घेण्यात मानवी कामगिरीची नोंद आहे. पारंपारिक ज्ञान जे तांत्रिक सामाजिक, संघटनात्मक किंवा सांस्कृतिक असू शकते ते जगण्याच्या आणि विकासाच्या महान मानवी प्रयोग म्हणून प्राप्त झाले.

**उद्देश:-**

१) भारतीय ज्ञान परंपरेची मुलभूत संकल्पना समजून घेणे.
२) इतिहासाच्या माध्यमातून ज्ञानपरंपरेचा विकास समजावून सांगणे.
३) राज्यव्यवस्था आणि प्रशासनातील भारतातील ज्ञानतत्वांचे योगदान जाणून घेणे.
४) भारतीय अर्थव्यवस्थेतील ज्ञानाचा प्रभाव अभ्यासणे.
५) भारतीय समाजरचनेतील मूल्ये व जीवनदृष्टी समजून घेणे.
६) भारतीय संस्कृतीतील कला भाषा साहित्य आणि तत्वज्ञानातील योगदान उलगडणे.

**गृहितके**

१) समाज, राज्यव्यवस्था आणि अर्थव्यवस्थेच्या निर्मितीमध्ये भारतीय ज्ञान परंपरा मुलभूत भूमिका बजावते.
२) शाश्वत समाजव्यवस्था घडविण्यासाठी भारताच्या प्राचीन ज्ञानसंपदेने महत्वपूर्ण तत्वज्ञान सांगितले आहे.
३) भारताच्या अर्थव्यवस्थेच्या वाढत्या विकासामध्ये पारंपारिक ज्ञान, हस्तकला, गणित, कृषी आणि व्यापार पद्धतींचे महत्व खूप अधिक प्रमाणात असल्याचे दिसून येते.
४) भारतीय संस्कृतीची वैविध्यता ज्ञानपरंपरेमुळेच टिकून आहे.
५) कौटिल्याचे अर्थषास्त्र, वेद-उपनिषदातील तत्वज्ञान आणि धर्मशास्त्रांतील नियम या सर्वांच्या सहभागामुळे राज्यकारभाराच्या विकासात भर पडली.

६) आधुनिक काळातही भारतीय ज्ञानपरंपरा शिक्षण, आरोग्य, राज्यनीती आणि समाजकार्यात उपयुक्त ठरू शकतात.

**संशोधन पद्धती**

हा संशोधन पेपर द्वितीय माहितीवर आधारित आहे. वर्तमानपत्रे, मासिके, कॉन्फरस प्रोसिडिंग, संपादित ग्रंथ, पुस्तके आणि इंटरनेट स्त्रोत यांचा वापर करण्यात आला आहे.

**भारतीय ज्ञानपंरपरेतील इतिहास**

भारतीय ज्ञान परंपरा आणि इतिहास ही जगातील सर्वात प्राचीन, सर्वसमावेशक आणि सातत्यपूर्ण ज्ञानव्यवस्थांपैकी एक मानली जाते. भारतीय ज्ञान परंपरा आणि इतिहास यांचा संबध अत्यंत अखंड आणि गुंतागुंतीचा आहे. भारतीय ज्ञान परंपरेने केवळ भूतकाळातील घटनांची नोंद केली नाही तर इतिहासाकडे पाहण्याचा आणि तो समजून घेण्याचा एक अद्वितीय दृष्टिकोन दिला आहे. भारतीय ज्ञान परंपरेची मुळे अत्यंत प्राचीन काळात रूजलेली असून ती संस्कृत वाङ्मय, वेद, उपनिषद, पुराणे, तत्त्वज्ञान व विविध विद्याशाखांमध्ये प्रकट झाली आहे. प्राचीन भारतातील ज्ञान परंपरा वेदांपासून सुरु होऊन विविध तात्विक वैज्ञानिक व सांस्कृतिक अंगांनी बहरली. या कालखंडात ज्ञानाच्या विविध शाखा प्रगत झाल्या ज्यात तत्त्वज्ञान, गणित, खगोलशास्त्र, आयुर्वेद, वास्तुशास्त्र व कला यांचा समावेश होता. प्राचीन काळातील ज्ञानांचे मूळ स्त्रोत वेद आहे ज्यामध्ये ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अर्थवेद यांचा समावेश असल्याचे दिसून येते. त्यामध्ये नैतिकता, विज्ञान व तत्त्वज्ञानाचे मूलतत्व सांगितलेले आहे. सोबतच इतिहासात महाकाव्ये जसे की, रामायण, महाभारत पुराणे वंशावळी आणि आख्यायिका यांचा समावेश होतो. ही साधने केवळ माहिती देत नाहीत तर राजकारण कर्तव्य व समाजाचे मुलभूत तत्त्वज्ञान शिकवले गेले आणि हेच ज्ञान आपल्याला भारतीय ज्ञान परंपरेतूनही शिकविले जाते. मंदिरे, स्तुपांचे शिलालेख आणि कला ही इतिहासाची मूळ साक्ष देतांना आपल्याला दिसून येतात. राजांचे विजय, त्यांचे धर्म प्रशासकीय आदेश यांची माहिती शिलालेखांमधुन मिळते जी त्या त्या कालखंडातील राजकीय आणि राजकीय स्थिती दर्शविते या विषयीची माहिती आपल्याला भारतीय ज्ञानपरंपरेतून प्रत्यक्षात येते. भारतीय ज्ञानपरंपरेने इतिहासाकडे केवळ रेखांकन (Chronology) म्हणून न पाहता, कालचक्र (Crucial View of Time) आणि धर्माधिष्ठित मार्गदर्शक म्हणून पाहतांना दिसते.

**भारतीय ज्ञानपंरपरेतील राज्यव्यवस्था**

पाश्चिमात्य राजकीय विचारवंतांनी भारतीय राजकीय विचारधारेबाबत न्यूनगंडात्मक दृष्टिकोन ठेवला होता. त्यांच्या मतानुसार भारतीय राजकीय विचारधारा प्रभावी ठरु शकत नाहीत तर पाश्चिमात्य राजकीय विचारच श्रेष्ठ आणि प्राचीन आहेत तथापि, प्रत्यक्षात मात्र भारतीय राजकीय विचारपरंपरा अत्यंत प्राचीन आहे याचे पुरावे आपणांस भारतीय ज्ञान परंपरेच्या इतिहासात आढळतात. कौटिल्य, मनू, अश्वघोष, बृहस्पती, भीष्मा, विशाखदत्त यांनी राजाच्या कर्तव्यांचे वर्णन केलेले आहे. भारतीय ज्ञान परंपरा ही तत्त्वज्ञान, विज्ञान कला, अध्यात्म आणि सामाजिक व्यवस्था यांचा समावेश असलेली एक व्यापक प्रणाली आहे, जिथे प्राचीन काळापासून राज्याच्या (शासनाची) संकल्पना, प्रशासन, कायदा आणि नीतिमत्त्वेवर प्रभाव टाकला आहे. ज्यात कौटिल्याचे अर्थशास्त्र, धम्म आणि राज्यकर्त्यांसाठी आवश्यक असलेल्या नैतिक आचरणाला महत्त्व दिले जाते, ज्यामुळे एक न्यायपूर्ण आणि नैतिक समाज निर्माण करणे हा तिचा उद्देश आहे. सोबतच कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथात अर्थशास्त्र आणि दंडनीती हे दोन शब्द राज्य चालविण्यासंबंधीच्या शास्त्राला दोन वेगवेगळ्या दृष्टीने लावण्यात आलेले आहेत. पहिला दृष्टिकोन म्हणजे सर्व प्रकारची संपत्ती, वैभव यासंबंधी विवेचन करण्याचे शास्त्र म्हणजे अर्थशास्त्र. दुसरा दृष्टिकोन लोकांवर राज्य करणे, अपराध्यांना शासन करणे यासंबंधीचे विवेचन करणारे शास्त्र म्हणजे दंडनीती.

वैदिक साहित्यात राज्याच्या उद्देशाने आणि कार्याचे स्पष्ट वर्णन दिलेले नाही. तथापि त्यामध्ये सापडलेल्या उल्लेखावरुन आपण असा निष्कर्ष काढू शकतो की, राज्याचे मुख्य उद्दिष्ट शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करणे आणि लोकांना सुरक्षा आणि योग्य न्याय देणे हे होते. राज्याचा स्वामी असलेल्या राजाला 'धृतव्रत' म्हणजेच कायदा व सुव्यवस्था राखणारा ही पदवी देण्यात आली आहे. राजा हा धर्म आणि नैतिकतेचा संस्थापक होता. दृष्टांना शिक्षा करणे. राज्याचे उद्दिष्ट केवळ भौतिक नव्हे तर प्रजेची नैतिक उन्नती करणे हे देखील आहे. वेद आणि उपनिषदांमध्ये राज्याचा मुख्य उद्देश लोकांचा सर्वांगीण विकास हाच सांगितला आहे. धर्माचे रक्षणकर्ते म्हणून राज्यकर्त्यांने सर्व धर्म आणि पंथांचा आदर केला आणि त्यांच्या विकासासाठी मदत केली. भारतीय विचारवंतांनी राजाला धार्मिक सहिष्णुतेच्या मार्गापासून दूर जाऊ नये असा सल्ला दिला आहे. धर्माचे संवर्धन हे राज्याचे प्रमुख कर्तव्य मानले गेले आहे. उच्च नैतिक आदर्श प्रजेसमोर मांडणे हे राजाचे कर्तव्य होते. गो-ब्राम्हणांचे रक्षण, विविध देवी-देवीतांच्या मंदिरांच्या योग्य व्यवस्थेत मदत करणे, लोकांमध्ये नैतिक आणि

धार्मिक जाणीव जागृत करणे, सन्यासांचा आदर करणे ही धार्मिक कार्ये होती. धार्मिक कार्य केल्याने दृष्काळ, महामारी इ. नैसर्गिक आपत्तीपासून राज्याचे रक्षण होते असे विष्णुधर्मोत्तरपुराणात म्हटले आहे. यावरुन स्पष्ट होते की, प्राचीन भारतीय राजांनी मानवी जीवनाच्या सर्व पैलूंच्या राज्याच्या कार्यक्षेत्रात समावेश केला होता.

**भारतीय ज्ञानपंरपरेतील समाज**

भारतीय ज्ञान परंपरा आणि समाज यांचा घनिष्ठ संबंध आहे. समाज ज्ञानाची निर्मिती करतो, ते जपतो आणि पुढच्या पिढीला हस्तांतरित करते तर ज्ञान परंपरा समाजाला दिशा देते. संस्कृती घडवते आणि वैज्ञानिक तसेच आध्यात्मिक प्रगतीला चालना देते, ज्यात वेद, उपनिषदे, कला, विज्ञान आणि स्थानिक आदिवासी ज्ञानाचा समावेश होतो जे नैतिक मुल्ये आणि निसर्गाशी सुसंगत जीवन जगण्यास शिकवतात. कोणत्याही समाजाची रचना, मूल्यव्यवस्था, संस्कृती, अर्थव्यवस्था व शासनपद्धती या सर्व गोष्टी त्या समाजातील ज्ञानपरंपरेवर आधारित असतात. पिढ्यानपिढ्या संकलित विकसित व प्रसारित झालेले अनुभवजन्य, तात्त्विक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक ज्ञान म्हणजे ज्ञानपरंपरा होय. ज्ञान, परंपरा आणि समाज यांचा परस्परांशी अतूट नातेसंबंध आहे. भारतीय ज्ञानपरंपरेने समाजाला जीवन जगण्यासाठी एक चौकट आणि नीतीचा आधार दिला. वेद, उपनिषदे आणि दर्शनशास्त्रे यांनी समाजाला सत्य, अहिंसा, त्याग आणि धर्माधिष्ठित आचरण यासारखी मुलभूत नीतीमुल्ये दिली ज्यामुळे सामाजिक व्यवहार आणि आंतर-मानवी संबंधाचे नियमन केले. सामाजिक रचना आणि स्थिरता आणि आश्रम व्यवस्था यांसारख्या संकल्पनांनी व्यक्तीचे जीवन टप्प्याटप्प्याने कसे विकसित करावे आणि प्रत्येक टप्प्यावर त्याने समाजाप्रती कोणती कर्तव्ये पार पाडावीत हे निश्चित केले त्यामुळे समाजात स्थिरता आणि संतुलन राखण्यास मदत मिळाली.

गुरु-शिष्य परंपरा, गुरुकुल आणि मठ यासारख्या सामाजिक संस्थांनी ज्ञान परंपरा मौखिक आणि लिखित स्वरूपात जतन केले. कुटूंब, पारंपारिक कला आणि हस्तकला यामुळे ज्ञान व्यवहारिक स्वरूपात टिकून राहिलेले दिसून येते. गौतमबुद्ध आणि महावीर यासारख्या सुधारकांनी ज्ञान परंपरेतील रूढ विचारांना आव्हान देऊन त्यात सुधारणा घडवून आणल्या. ज्ञान परंपरा समाजासाठी मार्गदर्शक तत्त्वांचे काम करते तर समाज ही ज्ञान परंपरा जिवंत ठेवण्यासाठी आधार प्रदान करतो. यावरुन असे स्पष्ट होते की समाज आणि ज्ञान परंपरा हे एकमेकांशी अखंडितपणे जोडलेले आणि परस्परपूरक घटक आहे.

**भारतीय ज्ञानपंरपरेतील अर्थव्यवस्था**

भारतीय ज्ञानपरंपरेत विविध विषयांचा अद्वितीय आणि समृद्ध ज्ञानाचा वारसा आहे. भारताच्या ज्ञानपरंपरेला हजारो वर्षांचा इतिहास आहे. वेद, उपनिषद, पुराण, रामायण, महाभारत, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, वास्तुशास्त्र आणि धर्मशास्त्र इ. ग्रंथांमध्ये विविध क्षेत्रातील ज्ञान संकलित केलेले आहे. या ग्रंथांमध्ये केवळ अध्यात्मिक आणि तात्विक ज्ञानच नाही तर व्यावहारिक ज्ञानाचा सुद्धा अध्ययन करण्यात आलेले आहे. या ज्ञानपरंपरेत कौटिल्याचे अर्थशास्त्र हा एक अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. ज्यामध्ये आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत सखोल वैचारिक मांडणी केली आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्राचा प्रमुख उद्देश राजधर्म, राज्यव्यवस्था, करसंकलन, आणि आर्थिक व्यवस्थापन यावर आधारित आहे. या ग्रंथात राज्याच्या आर्थिक विषयांवर सखोल विचार केला आहे. राजा कसा असावा, राज्याचे प्रशासन कसे चालवावे आणि समाजाच्या आर्थिक विकासासाठी काय पद्धती अवलंबाव्या लागतील याबाबतीत कौटिल्याने या ग्रंथात विचार मांडले आहेत.

ऋग्वेद, यजुर्वेद आणि अथर्ववेद यामध्ये संपत्ती, व्यापार, शेती आणि नैतिक आर्थिक व्यवस्थेचे संदर्भ आढळतात. उपनिषदांमध्ये अर्थ, धर्म आणि मोक्ष यांचा समतोल राखण्याचा विचार आहे तर मनुस्मृतीमध्ये सामाजिक व आर्थिक न्याय, संपत्तीचे वाटप आणि दानधर्म यावर भर देण्यात आला आहे. समाजातील प्रत्येक घटकाच्या गरजा लक्षात घेऊन आर्थिक धोरणे रचली गेली. अहिंसा आणि व्यापार यांचा समतोल साधण्याची भुमिका बौद्ध आणि जैन परंपरेत दिसते. भारतीय परंपरेत व्यापार हा केवळ नफा मिळविण्यासाठी नसून समाजाच्या कल्याणासाठी असावा असे सांगितले गेले आहे. पारंपारिक औषधी उत्पादने आणि हस्तकला उद्योग भारतीय अर्थव्यवस्थेला चालना देतांना दृष्टीस पडते. भारतीय अर्थशास्त्राच्या विचारांमध्ये धर्म, नैतिकता, समाजकल्याण आणि आर्थिक विकास या सर्व गोष्टींचे संतुलन राखलेले आहे.

**भारतीय ज्ञानपंरपरेतील संस्कृती**

भारत हा आधुनिक युगाच्या विज्ञानाच्या पलीकडे असलेल्या ज्ञानभूमीने सजलेला आहे. भारताने जगाला दिलेल्या ज्ञानाचे जतन आणि प्रचार करण्याची आणि भारतातील लोकांना संस्कृती, ओळख आणि प्राप्त ज्ञानाशी जोडण्याचे कार्य भारतीय ज्ञान परंपरेने केलेले आहे. भारतीय ज्ञान परंपरा आणि संस्कृती म्हणजे हजारो वर्षापासून विकसित झालेली एक समृद्ध प्रणाली आहे ज्यात वेद, उपनिषद, आयुर्वेद, गणित, खगोलशास्त्र, तत्त्वज्ञान आणि कला यांचा समावेश आहे. संस्कृती, ज्ञान आणि परंपरा हे तिन्ही घटक एकाच मानवी अस्तित्त्वाचे

अविभाज्य पैलू आहेत. ते एकमेकांना आधार देतात आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात. ज्ञान हे संस्कृतीचा बौद्धिक आणि वैचारिक पाया आहे. एखाद्या संस्कृतीने कोणत्या मूल्यांना प्राधान्य द्यावे. समाजाची रचना कशी असावी आणि निसर्गाकडे कसे पाहावे हे ज्ञान ठरवते. संस्कृती म्हणजे जीवन जगण्याची संपूर्ण पद्धत. संस्कृती ही ज्ञान आणि परस्परांना एकत्र बांधून ठेवणारी आणि त्यांना ओळख देणारी व्यापक चौकट होय.

आजच्या आधुनिक व जागतिकीकरणाच्या काळात पाश्चिमात्य विचारसरणी, तंत्रज्ञान आणि बदलत्या जीवनशैलीमुळे पारंपारिक ज्ञान परंपरांपुढे अनेक आव्हाने उभी राहिली आहेत. तथापि ज्ञान परंपरांमध्ये दडलेली मूल्ये, जीवनतत्त्वे आणि शाश्वततेची दृष्टी तितकीच उपयुक्त आहे. त्यामुळे संस्कृती आणि ज्ञान परंपरेचा अभ्यास करणे, त्यांचे जतन करणे आणि त्यांचे पूर्नमूल्यांकन करणे अत्यंत आवश्यक आहे.

**चर्चा**

भारतीय ज्ञान परंपरा ही अद्वितीय, अतुलनीय ज्ञान आणि बुद्धीचे महासागर आहे ज्यामध्ये ज्ञान व विज्ञान, वैश्विक आणि दिव्य, कर्म आणि धर्म तसेच भोंग आणि त्याग यांचा अद्‌भूत समन्वय आहे. इतिहास, राज्य, समाज, अर्थव्यवस्था आणि संस्कृती यांचे समन्वित दर्शन भारतीय ज्ञान परंपरेत घडून येते. प्राचीन परंपरेतील मूल्य, तत्त्वे आणि अनुभवाधारित ज्ञान यांचा पुनर्विचार व उपयोग केल्यास आधुनिक काळात शाश्वत विकास, सुशासन आणि सामाजिक समरसता साधता येऊ शकते. भारतीय परंपरा ही केवळ "जुन्या आठवणी किंवा जुनी पुस्तके नाहीत तर ती एक जिवंत शक्ती आहे. जितके आपण आपल्या प्राचीन ज्ञानाच्या मुळांशी जोडले जाऊ तितकेच आधुनिक जगाच्या आकाशात उंच झेप घेऊ शकू असा संदेश आपणांस आपली भारतीय ज्ञान परंपरा देत असते. आणि अजुनही देत आहे.

**निष्कर्ष:**

भारतीय ज्ञानपरंपरा ही एक समृद्ध  आणि वैविध्यपूर्ण बौद्धिक आणि सांस्कृतिक वारसा आहे ज्याने भारताचा भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य घडवले आहे. प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा धर्म व नैतिकतेच्या क्षेत्रात समृद्ध आहे. हिंदू धर्म, बौद्ध धर्म, जैन धर्म व सिख धर्म यांनी मानवी मूल्ये, नैतिकता व समाजातील समरसतेवर जोर दिला. या धर्माच्या तत्वज्ञानामूळे मानवता, करूणा व शांततेचे आदानप्रदान झाले ज्यामुळे भारतीय समाज अधिक समृद्ध व विविधतापूर्ण बनला. भौतिक  प्रगती आणि आध्यात्मिक उन्नती यांचा अतूट म्हणजेच न तुटणारे समन्वय भारतीय ज्ञान परंपरेनी साधला आहे. वसुधैव कुटुंबकम या तत्वाचे पालन केल्याने माणूस संपूर्ण मानवजातीचा अनुभव घेऊ शकतो. वसुधैव कुटुंबकम या तत्वाने समाजाला व्यापक दृष्टीकोन दिला. भारतीय राज्यघटनेतील राष्ट्र-राज्य आणि राज्यांचे संघटन, समानता आणि मूलभूत हक्क, लोकशाही, धर्मनिरपेक्षता यासह राज्य, आर्थिक तत्वज्ञान, सामाजिक रचना यासाठी संबोधित तत्वे तयार करण्यासाठी भारतीय ज्ञानपरंपरावर आधारित सखोल अभ्यासाची गरज आहे. भारतीय ज्ञानपरंपेनुसार राज्यव्यवस्था ही सत्तेसाठी नसून प्रजापालनासाठी आहे. सत्ता ही नेहमी धर्माच्या अधीन असावी हे या परंपरेचे सर्वात मोठे यश आहे. भारतीय ज्ञान परंपरेत कौटिल्याच्या अर्थशास्त्रीय विचारांना एक नवा दृष्टीकोन मिळाला आणि आजच्या काळात त्यांच्या सिद्धांताचे महत्व अबाधित असल्याच दृष्टीस पडते. कौटिल्याचे अर्थशास्त्र हे भारतीय ज्ञान परंपरेचे व्यावहारिक रूप म्हणजे संस्कृती. संस्कृती ही सर्वसमावेशक आहे, जिथे बाहय विविधतेही आंतरिक एकता जपली जाते. शेवटी भारतीय ज्ञान परंपरा "भूतकाळ" म्हणून विसरण्यासाठी नसून "भविष्य" घडवण्यासाठी पुन्हा एकदा अंगीकारण्यासारखी आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१) राठोड डॉ. अश्विनकुमार, "प्राचीन भारतीय ज्ञान परंपरा", श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर 2023
२) दायमा डॉ. ब्रिजमोहन, दायमा डॉ. सारिका, "भारतीय ज्ञान प्रणालीचा परिचय", विद्याभारती प्रकाशन, नागपूर
३) गजबे डॉ. विलास, कोंडेकर डॉ. संजिव, उपाध्याय डॉ. विनय, राऊत डॉ. प्रशांत, "भारतीय ज्ञान परंपरा जीवनमुल्ये व तत्वज्ञान", लोकायत पब्लिकेशन्स, सातारा, 2024
४) पोळ प्रशांत, "भारतीय ज्ञानाचा खजीना", स्नेहल प्रकाशन, पुणे 2023
५) https://hi.wikipedia.org
६) https://www.erpublication.com
७) https://www.mahamtb.com
८) https://indiafoundation.in
९) https://knowledgeableresearch.com